
ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 8 | ISSUE - 6 | FEBRUARY - 2022

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# छ. शिवाजी महाराजांचे जलव्यवस्थापन



**रेश्मा मारुती भगत**
संशोधक इतिहास विभाग , मोहोळ जि. सोलापूर.
**(M.A.B.Ed) History, NET - Qualified**

- **प्रस्तावना :-**

आपल्या भारत मातेने अनेक वीरांना जन्म दिला आहे. त्यांच्या जन्माने आपली मातृभूमी पावन झाली आहे. महाराष्ट्रात असाच एक शक्तिशाली, निष्ठावान, पराक्रमी, राजा होवून गेला. ते म्हणजे प्रौढ प्रताप पुरंदर..., क्षत्रीय कुलावंतस.. सिंहासनाधिश्वर ... महाराजाधिराज श्री छत्रपती शिवाजी महाराज . छत्रपती शिवाजी महाराज हे महान भारतीय राजा आणि रणनितीकार होते. ज्यांनी १६७४ मध्ये पश्चिम भारतात मराठा साम्राज्याचा पाया घातला. यासाठी महारांजाना अनेकांशी लढावे लागले. त्यामध्ये मोगल बादशहा औरंगजेब, विजापूरचा आदिलशहा आणि इंग्रज यांच्याशी युध्द करावे लागले. १६७४ मध्ये शिवाजी महारांजाचा रायगड येथे राज्याभिषेक झाला आणि ते मराठा साम्राज्याचे छत्रपती बनले. छत्रपती शिवाजी महारांजानी शिस्तबध्द व सुव्यवस्थित प्रशासकीय तुकडयांच्या मदतीने एक कार्यक्षम प्रशासन तयार केले . युध्द क्षेत्रात अनेक नाविन्यपुर्ण गोष्टी केल्या. गनिमी कावा हे नवीन युध्दतंत्र विकसित केले. असे हे शौर्य पराक्रमाचे महामेरु, रयतेचा आधार, अशक्य त्या हिंदवी स्वराज्याचे स्वप्न साकार करणारे छत्रपती शिवाजी महाराजांविषयीची, त्यांच्या व्यवस्थापनाची माहिती या शोधनिबंधात घेणार आहोत.

- **उद्देश :-**

१. छत्रपती शिवाजी महारांजाच्या कार्याची माहिती घेणे.
२. छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेल्या नियोजनाची, व्यवस्थापनाची माहिती घेणे
३. छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेले जलव्यवस्थापन गड व्यवस्थापन, आर्थिक व्यवस्थापन, लष्करी व्यवस्थापन यांचा आढावा घेणे.

- **शिवाजी महारांजा जन्म आणि कार्य :-**

मोगलांची जुलमी, रानटी राजवट उलथवून महाराष्ट्रामध्ये बहुजन समाजातील माणसांचे राज्य स्थापन करणारे क्षत्रिय कुलावंत श्री राजा छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म १९ फेब्रुवारी १६३० मध्ये शिवनेरी किल्ल्यावर झाला.

शिवाजी महाराजांचे वडिल शहाजीराजे भोसले, विजापूरच्या आदिलशहाचे सेनापती होते. आणि महारांजाची आई जिजाबाई या जाधव कुळात जन्मलेल्या हुशार व प्रतिभाशाली महिला होत्या. त्यांना आपण माँसाहेब, जिजाऊ या नावानेही ओळखतो. असे म्हणातात की, जिजाबाईंनी शिवाई देवीच्या नावावरुन आपल्या मुलाचे नाव शिवाजी ठेवले होते. जिजाबाई शिवाजी महाराजांच्या मार्गदर्शक, प्रेरणास्थान होत्या. शिवाजी महारांजाचे चरित्र त्यांच्या आईवडिलांच्या विचारांसोबत खूप मिळते जुळते होते. महाराजांवर त्यांच्या आई - वडिलांचा खूप प्रभाव होता. शिवाजी महाराजांनी अठरा पगड जातीतील मावळयांना आपल्या संघटन कौशल्याने, मायेने, ममतेने एकत्र आणून त्यांच्यासमोर प्रचंड मोठे ध्येय ठेवले. संकटाच्या काळात आणि दु:खाच्या महापूरातही छत्रपती शिवाजी महाराजांनी कधीही कुठलेही व्यसन केले नाही. शिवरायांच्या राज्यात स्त्रियांना मान, सन्मान होता . समाज परिवर्तन करणारे, समाजात क्रांती घडविणारे शिवाजी महाराज हे पहिले महामानव होते. अठरा पगड जातीतील लोकांच्या हाती तलवार देवून त्यांना स्वराज्याच्या कार्यात सामील करुन घेतले आणि स्वराज्याचे तोरण बांधले. राजांच्या न्यायव्यवस्थेत कोणालाही माफी नव्हती.

महाराजांनी ४०० वर्षापुर्वी जुलमी मुसलमान राजवटीत पिचलेल्या जनतेची सुटका केली आणि हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. रयतेच राज्य स्थापन केलं. हे स्वराज्य स्थापन करण्यासाठी त्यांनी योग्य व्यवस्थापन केलं. शिवाजी महाराजांच नेतृत्व, संघटन कौशल्य, युध्दनीती, गनिमी कावा हे खूप चांगले होते. त्यांचे नेतृत्वगुण, दळणवळणाचे व्यवस्थापन, लढाया, तह, स्वराज्य विस्ताराचे नियोजन, रसद पुरवण्याचे तंत्रज्ञान, मंत्रिमंडळ, सैन्य दलाची उभारणी ह्या अनेक पैलूतून शिवाजी महाराजांचे व्यवस्थापन कौशल्य बघायला मिळते.

त्यांच्या संपूर्ण आयुष्यातील अगदी छोटया- छोटया घटनांमधून आपल्याला खूप काही शिकायला मिळते. छत्रपती शिवाजी महाराज हे एक फक्त शासकच नव्हते तर ते उत्तम व्यवस्थापन गुरु देखील होते. त्यांचे व्यवस्थापन कौशल्य अव्दितीय होते. त्यांना प्रचंड दूरदृष्टी होती. त्या काळात त्यांनी दूरदृष्टीने भविष्याचा विचार करुन अनेक योजना आखल्या व उत्तम व्यवस्थापन कौशल्याचा वापर करुन महाराजांनी त्या यशस्वीही करुन दाखवल्या. आर्थिक, जल, पर्यावरण, स्वच्छता, लष्कर, गड आणि शासकीय या प्रत्येक क्षेत्रात शिवाजी महाराजांनी अनेक नवनवीन योजना आखल्या व त्या यशस्वी ही केल्या .

**शिवाजी महारांजाचे व्यवस्थापन :-**

छत्रपती शिवाजी महाराजांचे काम करण्याचे व्यवस्थापन आयुष्य जगण्यासाठी आजही प्रेरणा देते. युध्दतंत्रातून प्रत्येक वेळी शिवाजी महाराजांनी विजय साध्य केला. संधी आहे ती शोधा हेच शिवाजी राजांनी त्यांच्या चरित्रातून सांगितले. आग्राहून सुटका करुन रायगडावर पोहोचणे यात शिवाजी महाराजांचे उत्तम व्यवस्थापन दिसून येते. माणसे तयार करताना ती जतन कशी करावी याबाबत महाराजांचे नेतृत्व व्यवस्थापन उत्कृष्ट होते. शिवरायांनी सर्वात जास्त खर्च हेर खात्यावर केला. स्वराज्यातील गड - किल्ले म्हणजे शिवाजी महाराजांच्या आदर्श व्यवस्थापनाची केंद्रे होती. गड-किल्ल्यावर आपत्कालीन व्यवस्था नेहमी सज्ज असे. प्रत्येक निसर्गनिर्मित व मानवनिर्मित संकटाच्यावेळी तातडीने मदतीसाठी प्रत्येक किल्ल्यावर खास युनिट नेमलेले असे छत्रपतीनी आपल्या शासनव्यवस्थेत अंमलात आणलेले व्यवस्थापनाशास्त्र श्रेष्ठ दर्जाचे होते. शिवाजी महाराज आधुनिक व्यवस्थापनाचे गुरु होते. शिवाजी महाराज प्रत्येक टप्प्यावर यशस्वी झाले त्याचे महत्वाचे कारण म्हणजे त्यांचे व्यवस्थापन होय. त्यांनी स्वराज्यातील प्रत्येक मावळयाला आदर्श व्यवस्थापनाचे धडे दिले होते.अचानक येणाऱ्या संकटाच्या वेळी त्याच्यावर मात करण्यासाठी छत्रपतींचे नियोजन तयार असे . छत्रपती शिवाजी महाराज म्हणजे सर्व सामान्य जनतेच्या हितासाठी आयुष्यभर जगणारे सर्वश्रेष्ठ शासनकर्ते होते.

- **जलव्यवस्थापन :-**

महाराष्ट्रात, सह्याद्रीच्या शिखर माथ्यावर अनेक गड किल्ले आहेत. त्यातील काही किल्ले शिलाहार काळातील काही किल्ले यादव कालीन तर काही किल्ले शिवकालीन आहेत. शिवाजी महाराजांचे स्वराज्यच या गड - किल्ल्यांच्या आश्रयाने उभे राहिले होते. त्यामुळे गडावर शिवाजी महाराजांचे विशेष लक्ष असे डोंगरामाथ्या वरील या किल्ल्यावर प्रथम प्राधान्य पिण्याच्या पाण्याला असे. एका आज्ञापत्रात शिवाजी महाराज म्हणतात.

" गडावर आधी उदक पाहुन किल्ला बांधावा ज्या ठिकाणी पाणी नाही त्या ठिकाणी गडाची बांधणी आवश्यक असेल तर आधी खडक फोडून त्या ठिकाणी तळी, पाण्याचे मोठ मोठे टाके बांधावे जेणेकरुन पर्जन्यकाळात संपुर्ण गडास पाणी पुरेल गडावर जिवंत पाण्याचे झरे असतील ते शोधावे त्याचा वापर करावा. त्या झऱ्यांचा वापर करुन तळी बांधावी. त्या तळयातील गाळ वेळोवेळी उपसुन पाणी स्वच्छ राहील याची काळजी घ्यावी. जसे तसे पाणी पुरते म्हणून तितक्यावरच निश्चित न राहता इतर ठिकाणी देखील पर्यायी तळी किंवा टाके बांधून काढावे जर पाण्याचे झरे हल्ल्यामुळे किंवा इतर कारणाने बंद झाले तर पर्यायी तळी, टाक्यांचा वापर केला जावू शकतो. पाणी बिनकामी खर्च होवू न दयावे. गडाचे पाणी बहुत जतन करुन टिकवावे. गड व पाण्याच्या देखभालीसाठी लोकं कामी ठेवावी यासाठी त्यांना आवश्यक असलेली अवजारे हत्यारे दयावी. "

गडावरील शिबंदीला वर्षभर पाणी कसे पुरेल याचे नियोजन चोख आणि काळजीपुर्वक रित्या शिवाजी महाराजांनी अत्यंत दूरदृष्टीने करुन ठेवले होते. छत्रपत्री शिवाजी महाराजांचे जलव्यवस्थापन आणि दूरदृष्टी यांचा जर अभ्यास करायचा असेल तर रायगड जरुर पहावा. रायगडावर डोंगराच्या पोटात खोदलेली टाकी, तळी पाहिली की लक्षात येते महारांजाचे जलव्यवस्थापन आणि दूरदृष्टीकोन किती प्रचंड होता.

पूर्वी या रायगडाचे नाव रायरी असे होते. शिलाहार राजांपासून ते अगदी छत्रपती शिवाजी महाराजापर्यंत अनेकांनी या किल्ल्यावर वास्तव्य केले. रायरी हा किल्ला ०६ एप्रिल १६५६ साली चंद्रराव मो-यांकडून जिंकला आणि स्वराज्यात दाखल केला . जेंव्हा शिवाजी महाराज स्वतः या रायगडावर आले तेंव्हा त्यांनी सरळसोट भिंतीसारखे चहूबाजूंनी तुटलेले उभे कडे, दीड वाव उंच आणि वर चौरंगासारखा दीड मैल लांब आणि १ मैल रुंद सपाट माथा पाहिल्यावर ' तक्तासाठी हीच योग्य जागा आहे. असे त्यांना वाटले आणि स्वराज्याची राजधानी म्हणून रायगडाची पुनर्बांधणी केली. या रायगडाच्या पुनर्बांधणीसाठी लागणारे दगड, चिरे रायरीचा डोंगर फोडून जमा केले. आणि खणलेल्या जागेत मोठ मोठे तलाव बांधून रायगडावर मुबलक पाणीसाठी उपलब्ध करुन दिला. गंगासागर तलाव, कोळीम तलाव, कुशावर्त तलाव, हत्ती तलाव, काळा तलाव आणि इतर तीन तलाव रायगडावर आहेत. त्यातील गंगासागर तलाव राजवाडयाच्या समोर बांधलेला असून तो सर्वात मोठा जलसाठा असलेला तलाव आहे. तसेच गडावर जवळ जवळ पाऊणशे पाण्याच्या टाक्या आहेत. शिवाजी महाराजांच्या राज्यभिषेकाला

रायगडावर एक लाखाहून अधिक पाहूणे आले होते. या महान समारंभातील सर्व लोकांच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था या गडावरील पाणवठयावर केली होती. तरीसुध्दा पाण्याचा मुबलक साठा शिल्लक होता.'

रायगडावरील गंगासागर तलावात राज्यभिषेका वेळी सप्तनदयांचे पाणी टाकले आहे. रायगडावर सर्वांना मुबलक पाणी पुरेल एवढया पाण्याचे नियोजन कसे करण्यात आले याचा पुरावा रायगडावरच पहायला मिळतो. शिवाजी महाराजांनी रायगडावर सर्व प्रथम दगडात बनवलेले पर्जन्यमापक यंत्र कुशावर्त तलावा जवळ मंदिराच्या मागे बांधून घेतले. कौटिल्याने दोन हजार चारशे वर्षापूर्वी पर्जन्य मापकाचा उपयोग शेती आणि धरणे बांधण्यासाठी केला होता. रायगडावरील दगडात बनवलेले हे पर्जन्यामापक म्हणजे कौटिल्यच्या पर्जन्यामापकाची सुधारित आवृती म्हणजे आधुनिकच म्हटले पाहिजे. वर्षाला सरासरी किती पाऊस पडतो हे पर्जन्यमापकामुळे कळत असल्यामुळे रायगडावरील शिबंदीसाठी किती तळी खोदावी लागतील, त्यासाठी त्यांची लांबी - रुंदी व खोली किती ठेवायची म्हणजे त्यात साठलेले पाणी वर्षभर पुरेल याचा अंदाज घेवून गडावरील तलाव बांधण्यात आले आहेत.

प्रत्येक किल्ल्यांवर पाण्याची साठवणूक शिवराय काटेकोरपणे करत असत. प्रत्येक किल्ल्यावर वर्षभर पुरेल आणि प्रसंगी गडावर हल्ला झाला तर आणीबाणीच्या काळातही आवश्यक तो पाणीसाठा कसा राहिल याची योग्य ती काळजी शिवरायांनी घेतली होती.

जलदुर्गावरही असेच जलव्यवस्थापन केले होते . भोवताली खारे पाणी असून देखील गडावरील विहीरी, तलावात गोड पाणी आजही आढळून येते. दुष्काळी परिस्थितीत आजही गडावरुन शेजारच्या गावात पाणी पुरवठा होत असल्याचे कित्येक गावकऱ्यांनी सांगितले. छोटे - छोटे ओढे -नाले किंवा नदयांवर लहान - लहान बंधारे घालून त्यातील पाणी पाटाद्वारे शेतीला पुरवले जात असे. छत्रपती शिवाजी महाराजांना जसे अनेक स्वामीनिष्ठ मावळयांचे सहकार्य लाभले . तसेच भौगोलिक , प्रादेशिक घटकांचेही सहकार्य मिळाले . या भौगोलिक प्रदेशांचा योग्य वापर शिवाजी महाराजांनी स्वराज्यासाठी करुन घेतला.जल व्यवस्थापन, दुष्काळ निर्मूलन याला शिवाजी महाराजांनी प्रथम प्राधान्य दिले.

## • शिवाजी महाराजांचे जलव्यवस्थापन तंत्र आज वापरण्याची गरज :-

दगडखाणी खणताना दुहेरी फायदा मिळविण्यासाठी शिवाजी महाराजांचे जलव्यवस्थापन तंत्र वापरात आणले पाहिजे. त्यामुळे शिवकालीन जलसंस्कृतीचा वारसा देखील जतन करता येईल . महाराष्ट्रात ८२% बेसॉल्ट खडक आढळतो. बेसॉल्टची पाणी साठवण्याची क्षमता ५% पेक्षा कमी आहे. या खडकाच्या पाणी न मूरणे या वैशिष्टयाचा सकारात्मक विचार करता हा दगड तलाव खणण्यासाठी उपयुक्त आहे. त्यामुळे कल्पकतेने उपयोग केल्यास दगड खाणीत पाण्याचा साठा करणे सहज शक्य आहे.

## • सारांशलेखन :-

आधुनिक व्यवस्थापन शास्त्राचे जनक छत्रपती शिवाजी महाराजांची दूरदृष्टी लोककल्याणकारी धोरणे, परकीय शक्तींना थोपवण्याची क्षमता कौशल्य, मुत्सद्देगिरी आणि शौर्य पाहता ते आधुनिक व्यवस्थापनाचे जनक आहेत असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. कोणतीही लढाई, तह, स्वराज्य विस्तारामधील त्यांचे नियोजन हे व्यवस्थापन शास्त्राला पूरक असेच होते. छत्रपतीचे व्यवस्थापन खूप श्रेष्ठ दर्जाचे होते. एक उत्तम व्यवस्थापक म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यवस्थापन आजच्या काळातही जगाला दिशा देणारे आदर्शवत व महत्वपुर्ण असेच आहे.

## • निष्कर्ष :-

१. छत्रपती शिवाजी महाराजांनी अनेक संकटांवर मात करुन स्वराज्याची स्थापना केली.
२. अठरा पगड जातीतील मावळयांना एकत्र करुन समाज परिवर्तन घडवून आणले.
३. दुष्काळ निर्मुलन करण्यासाठी दूरदृष्टीने जलव्यवस्थापन केले.
४. शिवाजी महाराजांच्या नियोजनाची, व्यवस्थापनाची आज गरज आहे.

## • संदर्भग्रंथ सुची :-


१. शिवाजी कोण होता ? :- गोविंद पानसरे
२. विचारपीठ :- चंद्रशेखर गायकवाड
३. शिवाजी महाराजांचे आदर्श व्यवस्थापन :- डॉ. मधुकर जाधव
४. शिवकाळातील जलव्यवस्थापन :- सदाशिव टेटविलकर